# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४/ माघ ३०, शके, १९४५.

५. लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण :-

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. प्रलंबित ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ६५ निवेदनांपैकी ७ निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३८ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ५८ निवेदनांपैकी १३ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,<br>
मुंबई,<br>
दिनांक : १९ फेब्रुवारी, २०२४

जितेंद्र भोळे<br>
सचिव-१ (कार्यभार),<br>
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्र. ३४३**

श्री. रमेश कोरगांवकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईसह राज्यातील शहरी भागात विकसीत करण्यात आलेल्या नवीन इमारतीला ओ.सी. देण्यापूर्वी संबंधित महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत पाहणी करुन एन.ओ.सी. घेणे बंधनकारक असणे, असतानांही इमारतीमध्ये अग्निशमन दलाचे अधिकारी प्रत्यक्ष पाहणी न करता तसेच इतर नियम धाब्यावर बसवून चुकीच्या पद्धतीने एन.ओ.सी. देत असल्याचे निदर्शनास येणे, अग्निशामक दलाचे अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी न करता एन.ओ.सी. देत असल्यामुळे अनेक इमारतींमध्ये आग लागल्यानंतर आग विझवणे किंवा नियंत्रण करणे कठीण होणे, परिणामी मोठी दुर्घटना होऊन जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढते प्रकार, शासनाने यासर्व प्रकरणी चौकशी करुन इमारतीची प्रत्यक्ष पाहणी न करता बेजबाबदारपणे एन.ओ.सी. देणाऱ्या अग्निशामक दलातील अधिकाऱ्यांवर कठोत कारवाई करण्याची आवश्यकता."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ३ अन्वये सुसज्ज अग्निशमन यंत्रणा बसवून ती नेहमी दुरुस्त व कार्यक्षम स्थितीत ठेवण्याची जबाबदारी इमारतीचे मालक/भोगवटादार यांची आहे. मुंबईसह राज्यातील शहरी भागात विकसीत करण्यात येणाऱ्या नवीन इमारतींना अग्निशमन दलाकडून खालीलप्रमाणे प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला घ्यावा लागतो आणि इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला घेणे बंधनकारक आहे. सदर दाखले देण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**<u>प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) देण्याची कार्यपद्धती</u> :-**

इमारतीचे बांधकाम करण्याआधी अग्निशमन विभागाचा प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) हे विकास नियंत्रण नियमावली अन्वये बंधनकारक आहे. तात्पुरता अग्निशमन ना हरकत दाखला देण्याकरीता आलेल्या प्रस्तावाची छाननी करून मुंबईसह सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/ विशेष नियोजन प्राधिकरणांचे मुख्य अग्निशमन अधिकारी हे विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम होणार आहे किंवा कसे हे तपासले जाते. त्यानंतर इमारतीचे नकाशे तपासून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या अनुसूची-एक तसेच राष्ट्रीय इमारत बांधकाम संहिता २०१६ च्या तक्ता-७ मध्ये दिलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने अग्निशमन दलामार्फत इमारतीस बसवावी लागणारी अग्निशमन यंत्रणा सुचवून प्राथमिक अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) देण्यात येतो.

**<u>अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) कार्यपध्दती</u> :-**

इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व भोगवटा प्रमाणपत्र देण्याआधी विकासकाने अग्निशमन विभागात अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) मिळविण्याकरीता अर्ज सादर करणे आवश्यक आहे. असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर मंजूर नकाशे, अग्निशमन विभागाचा तात्पुरता अग्निशमन ना

हरकत दाखला, लिफ्ट प्रमाणपत्र आणि प्रामुख्याने महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ३ (१) नुसार सर्व अग्निशमन यंत्रणा बसवून ती कार्यान्वित असल्याबाबतचे अनुज्ञप्तीधारक अभिकरणांकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नमूना-अ मध्ये प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अग्निशमन दलाचे मुख्य अनिशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी प्रत्यक्ष इमारतीमध्ये जावून बसविण्यात आलेली अग्रिशमन यंत्रणा कार्यान्वित असल्याची तपासणी करुन खात्री करुन घेतात आणि त्यानंतरच अग्निशमन दलाकडून अंतिम अग्निशमन ना हरकत दाखला (एन.ओ.सी.) देण्यात येतो. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवरक्षक उपाय योजना अधिनियम, २००६ च्या कलम ३ (३) नुसार इमारतीस बसविण्यात आलेली अग्निशमन यंत्रणा दुरुस्त आणि कार्यक्षम स्थितीत ठेवण्याबाबतचे अनुज्ञप्तीधारक अभिकरणांकडून नमुना-ब मधील प्रमाणपत्र मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा नामनिर्देशित अधिकारी यांच्याकडे वर्षातून दोन वेळा जानेवारी व जुलै या महिन्यांमध्ये सादर करण्याची जबाबदारी मालक/ भोगवटार यांची आहे.

तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक नियम, २००९ च्या नियम २६ मध्ये अग्निशमन अधिकाऱ्यांविरुद्ध किंवा अग्निशमन कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. विहीत कार्यपद्धती न अवलंबता एन.ओ.सी. देण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास प्रकरणपरत्वे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करता येईल.

*************************

एच-१३८७-१अ.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४१**

**श्री. सुनील केदार, श्री. निलेश लंके, श्री. अबू आजमी, श्री. मोहन मते,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास मुलुंड येथील महानगरपालिकेच्या एम.टी. अग्रवाल रुग्णालयात आय.सी.यु. मधील रुग्णावर उपचार करण्यासाठी बोगस डॉक्टरची नियुक्ती करून रुग्णाच्या जीवाशी खेळ झाल्याचा प्रकार उघडकीस येणे, पालिकेच्या एम.टी. अग्रवाल रुग्णालयातील अतिदक्षता विभागात नोंदणी करून डॉक्टरांच्या नावाचा वापर करून भांडा फोड करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा भावंडाकोट झाल्यानंतर या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या चंद्रशेखर हा चीन मधून एमबीबीएस झाला असून त्याने अग्रवाल रुग्णालयासह पालिकेच्या अन्य रुग्णालयातील सेवा बजावली असल्याचे उघड होणे, चंद्रशेखर याच्यासह इस्त्राईल, फिलिपिन्स आणि रशियामध्ये नोंदणी केलेल्या डॉक्टरांनी अग्रवाल रुग्णालयात उपचार दिल्याची बाब उघडकिस येणे, डॉक्टर पुरविणाऱ्या जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या सहा संचालकांविरोधात मुलुंड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असल्याची बाब उघडकीस येणे, जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने पाठवण्यात येणाऱ्या डॉक्टरांना एक लाख सत्तर हजार ऐवजी संस्थेकडून त्यांना तीस हजार रुपये देण्यात येत असणे व उर्वरित रक्कम संस्था खिशात घालत असल्याची बाब उघडकिस येणे, मूळ डॉक्टरच्या नावावर बोगस डॉक्टरांचा पुरवठा करून रुग्णांच्या जीवाशी खेळल्यामुळे मुलुंड येथील पालिकेच्या एम.टी.अग्रवाल रुग्णालयात गेल्या काही काळात ४५ रुग्णांचा मृत्यू झाल्याची बाब तपासात उघडकीस येणे, मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या सहकार्याशिवाय होऊ शकत नसल्याबद्दल संपूर्ण मुलुंडच्या जनतेमध्ये निर्माण झालेला ठाम विश्वास, त्यामुळे सर्व संचालकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी व त्याकडे गृह विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबईतील एकूण सोळा विविध रुग्णालयांमध्ये या जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने डॉक्टर पाठवण्यात येत असल्याचे तपासात निष्पन्न होणे, यामुळे मुंबई शहर व उपनगरामध्ये औषध उपचार घेणाऱ्या लाखो नागरिक व त्यांच्या नातेवाईकांच्या मनामध्य प्रशासनाच्या अकार्यक्षमतेबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमधील अतिदक्षता विभागामध्ये निवासी डॉक्टरांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे बाह्यस्त्रोतीकरणाद्वारे तज्ञ डॉक्टरांच्या सेवा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबवून दिनांक १७.०५.२०१८ ते दिनांक १६.०५.२०२० या दोन वर्षाच्या कालावधीकरिता सिद्धार्थ रुग्णालय, गोरेगांव (प), भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, कांदिवली, मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय, गोवंडी, क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय, विक्रोळी आणि श्रीमती म. तु. अगरवाल रुग्णालय, मुलुंड (पश्चिम), के.बी. भाभा रुग्णालय, कुर्ला, व्ही.एन. देसाई रुग्णालय, सांताक्रुझ आणि हिंदुहृदयसम्राट

बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालय, जोगेश्वरी येथील अतिदक्षता विभागातील तज्ञ डॉक्टरांच्या सेवा जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेमार्फत घेण्यात आल्या. जीवन ज्योत संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ९ रुग्णालयांमध्ये दिनांक १७.०५.२०१८ ते दिनांक १६.०५.२०२० या कालावधीत दिलेल्या डॉक्टरांच्या सेवांकरिता महानगरपालिकेमार्फत रुपये -/१२,२९,७५,९००इतके अधिदान करण्यात आले आहे. तद्नंतर सन २०२० मध्ये कोविडच्या जागतिक साथीमुळे निविदा प्रक्रिया न करता आल्याकारणाने सदर सेवांचा कालावधी माहे सप्टेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात आला.

निविदेतील अटी व शर्तीनुसार अतिदक्षता विभागात एका सत्रात १ पदवीधर व १ पदव्युत्तर डॉक्टर पाठविणे व त्यांची आवश्यक प्रमाणपत्रे पडताळणे याची जबाबदारी पूर्णपणे जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेची होती. अतिदक्षता विभागात परिचारिका, कक्ष परिचर, सफाईगार, महानगरपालिकेचे नियमित कर्मचारी होते. सदर अतिदक्षता विभागातील कामाचे पर्यवेक्षण महापालिकेतील डॉक्टरांकडून केले जात होते. श्रीम. म. तु अगरवाल रुग्णालय, मुलुंड येथील अति दक्षता विभागातील सेवा देणाऱ्या काही डॉक्टरांच्या प्रमाणपत्राबद्दल शंका आल्याकारणाने एका तक्रारदाराने मुलुंड पोलीस ठाणे येथे डॉक्टर बोगस असल्याबाबतची तक्रार दाखल केली. त्या अनुषंगाने मुलुंड पोलीस स्टेशनमार्फत तपासकार्य सुरू असून अद्याप अंतिम अहवाल प्राप्त झाला नाही. तसेच, जीवनज्योत चॅरीटेबल ट्रस्ट मार्फत एम. टी. अगरवाल रुग्णालयमुंबई येथे काम केलेल्या , मयतांचे मृत्यू दाखले दिले ८४ त्यांनी एकूण .बनावट डॉक्टर असल्याचे निष्पन्न झाले आहे ४ डॉक्टरांमध्ये असून, त्यापैकी .जे.सर जे ,मयतांच्या उपचारांचे कागदपत्रे पडताळून अभिप्राय देण्याकरीता अधिष्ठाता ७४ .रोजी पाठविण्यात आले आहेत ०७.०७.२०२३ रुग्णालय यांचेकडे मुलुंड पोलिस ठाणेमार्फत दिनांक

श्रीम. म. तु अगरवाल रुग्णालय, मुलुंड येथील अतिदक्षता विभागामध्ये गंभीर तसेच अतिगंभीर रुग्ण दाखल असतात. सदर रुग्णालयात सर्वसाधारणपणे मागील दहा वर्षांत सरासरी १२५ ते १५० वार्षिक मृत्यूचे प्रमाण असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, सदर रुग्णालयात सन २०१९ मध्ये १४५, सन २०२० मध्ये १३४, सन २०२१ मध्ये १२९ आणि सन २०२२ मध्ये १४४ मृत्यू झाले आहेत.

सन २०२१ मध्ये नवीन निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली व माहे ऑक्टोबर २०२२ पासून नवीन कंत्राटदार म्हणून नवीन निविदेतील दराप्रमाणे जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेची श्रीम. म. तु अगरवाल रुग्णालय, मुलुंड, म.वा. देसाई रुग्णालय, मालाड व भगवती रुग्णालय, बोरीवली या ३ उपनगरीय रुग्णालयांतील अतिदक्षता विभागासाठी नियुक्ती करण्यात आली होती.

सद्य:स्थितीत दिनांक ५ जुलै, २०२३ पासून जीवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सेवा खंडित करून सदर संस्थेस ३ वर्षांच्या कालावधीसाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.

**********

एच-१५६४-१३.

CR 590_2023_241_C_01

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक ७४९

**श्री. अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, श्री. अस्लम शेख, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. झीशान सिध्दिकी, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. अबू आजमी,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईमध्ये शेकडो किमीच्या भूमिगत मलवाहिन्या असणे, त्यांच्या सफाईसाठी मॅनहोलमध्ये माणसे उतरवली जाणे, मॅनहोलमधील विषारी वायुमुळे अनेक कंत्राटी कर्मचारी मृत्युमुखी पडणे, काही कर्मचाऱ्यांना श्वसनाचे जीवघेणे विकार जडणे, भूमिगत गटारात उतरून हाताने मैला साफ करण्यास बंदी असणे, मुंबई महापालिकेकडे आधुनिक व स्मार्ट तंत्रज्ञानावर आधारित यंत्रसामग्री उपलब्ध असताना देखील आजही सफाई कामगारांना मॅनहोलच्या घाणीत माणूस उतरवून भूमिगत गटारांची सफाई करण्यात येणे, भूमिगत गटारांमध्ये सफाई करताना गोवंडीमध्ये दोन कर्मचाऱ्यांचा मृत्यू होणे, कांदिवली येथे भूमिगत गटारातून सफाई करून बाहेर येताना कामगाराच्या अंगावरून गाडी जाणे, आतापर्यंत ४१ जणांचा भूमिगत गटारात पडून मृत्यू होणे, सफाई कामगाराच्या सुरक्षेसाठी कोणतीही प्रणाली किंवा साहित्य देण्यात न येणे, यामुळे सफाई कामगारांमध्ये असलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रचालन विभागामध्ये वाहनविराजित अत्याधुनिक यंत्रसामुगीच्या सहाय्याने (यांत्रिक पध्दतीने) मलनिःसारण वाहिन्यांचे परिरक्षण करण्यात येते. मलनिःसारण विभागाच्या पूर्व उपनगरात २६, पश्चिम उपनगरात ३५ व शहर विभागात २९ अशी एकूण ९० वाहनविराजित यंत्रे कार्यरत असून, सदर यंत्राद्वारे सफाई करण्यात येत आहे.

सन २०१३ पासून हाताने मैला उचलणे प्रतिबंध कायदा अंमलात असल्याने मलनिःसारण प्रचालन खात्यामध्ये यांत्रिक पध्दतीने परिरक्षण करण्यात येते व कामगारांना सफाईसाठी मनहोलमध्ये उतरवले जात नसल्याने कोणत्याही कामगाराचा मृत्यू झालेला नाही. मलनिःसारण प्रचालन विभागातील सर्व कामगारांना वेळोवेळी रिफ्लेक्टींग जॅकेट, हेल्मेट, शेफ्टी शूज, हॅंड ग्लोज, मास्क, इत्यादी सुरक्षिततेची साधने पुरविले जातात. मलनिःसारण प्रचालन विभागाचे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र असून त्यामध्ये सर्व कामगार / अधिकाऱ्यांना आरोग्य व सुरक्षेसंबंधित प्रशिक्षण दिले जाते.

मेसर्स ग्यान कंस्ट्रक्शन कं. यांना दिनांक २६.०१.२०२१ रोजी गोवंडी येथील नवीन मलनिःसारण वाहिनी टाकण्याच्या कामाचा कार्यादेश देण्यात आला. सदर कार्यादेशानुसार काम सुरू करण्याचा दिनांक २६.०१.२०२१ व काम संपविण्याचा दिनांक २८.०१.२०२४ असा आहे. सदर ठिकाणी सुरु असलेले खोदकाम दिनांक १५.०५.२०२३ पर्यंत थांबवावे व त्यानंतर कोणतेही नव्याने खोदकाम करण्यात येऊ नये. तसेच खोदकामासाठी मारण्यात आलेल्या चरीच्या पुनर्पृष्टीकरणाचे काम दिनांक ३१.०५.२०२३ पूर्वी पूर्ण करण्यात यावे अशा सूचना कंत्राटदार मेसर्स ग्यान कंस्ट्रक्शन कं. यांना दिनांक १०.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने सदर कामाच्या व्याप्तीमध्ये

असलेली ६०० मि.मी. व्यासाची मलनि:सारण वाहिनी (४३ मनुष्यप्रवेशिकांच्या बांधणीसहीत) टाकून, वाहिनी टाकण्यासाठी खोदण्यात आलेल्या चरीच्या पुनर्पृष्टीकरणाच्या कामासहित दिनांक १९.०५.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आले होते. सदर काम पूर्ण झाल्यामुळे व जून २०२३ ते सप्टेंबर २०२३ मधील पावसाळा पाहता कंत्राटदाराने हस्तांतरासाठी करावी लागणारी टेस्टींग, एजबिल्ट ड्रॉइंग, टोटल स्टेशन सर्व्हे इ. कोणतीही प्रक्रिया चालू केली नव्हती. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी दिनांक २८.०१.२०२४ असल्याकारणाने हस्तातंराची सर्व प्रक्रिया पावसाळयानंतर करणे अपेक्षीत होते. त्यामुळे कंत्राटदारास मलनि:सारण प्रचालन विभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याकडून मनुष्यप्रवेशिका साफ करण्याच्या सूचना देण्यात आल्या नव्हत्या. पावसाळयात पुनर्पृष्टीकरणावर पडणारे खड्डे भरणे व तेथील रहिवाशांना / गाड्यांना त्यांचा त्रास होऊ नये या दृष्टीकरणातून कंत्राटदाराने काम करणे अपेक्षित होते.

दिनांक २४.०६.२०२३ रोजी ९० फिट रोड नं १० येथील मनुष्यप्रवेशिका नं. ३२ मध्ये कंत्राटदाराचे दोन कामगार उतरुन मरण पावले. ज्या दिवशी सदर दुर्घटना घडली त्या दिवशी कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराकडून सुरु असलेल्या कामाविषयी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्प विभागास कंत्राटदाराने कोणतीही पूर्व सुचना दिली नव्हती. सदर प्रकरणी कंत्राटदारामार्फत मृत कामगारांच्या परिवारास रू. १०,००,०००/- प्रत्येकी असे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खात्यांतर्गत चौकशी चालू आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर प्रकरणाबाबत कंत्राटदारास रु. ५०,०००/- दंड आकारला आहे व त्यास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून काढण्यात येणाऱ्या निविदेतील अटी व शर्तीमध्ये कंत्राटदाराने काम करतेवेळी कामगारांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याबाबत अट अंतर्भूत असते, सदर अटींमध्ये कामगारांना रिफ्लेक्टींग जॅकेट, हेल्मेट, शेफ्टी शूज, हँड ग्लोज, मास्क इत्यादी सुरक्षिततेची साधने पुरविणे आवश्यक आहे. तसेच कामगारांच्या कल्याणाकरिता कंत्राटदाराने कामगारांचा विमा काढणे, किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे, बालकामगार कायदयानुसार बालमजूर कामास न लावणे, भविष्य निर्वाह निधी देणे, कामगार भरपाई कायदा १९२३ अंतर्गत कामगारास भरपाई देणे इत्यादी बाबतच्या सर्व अटी कंत्राटात अंतर्भूत असतात. त्यानुसार कंत्राटदाराने सदर अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

दिनांक ११.०६.२०२३ रोजी शुभशांती को.ऑ.हौ. सोसायटी, डहाणुकरवाडी, कांदिवली (प.) येथे खाजगी पावसाळी गटाराचे झाकण उघडून गटाराची साफसफाई करत असताना सदर सोसायटीतील वाहन अंगावर चढून एका कामगाराचा मालाड येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असतांना मृत्यु झाला आहे. त्यानुसार संबधित ठेकेदार व वाहन चालकाविरोधात कांदिवली पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ३८०/२०२३ कलम २७९, ३३६, ३३८, ३०४ (अ) भा.द.वि. सह कलम १९६ मोटार वाहन कायदा अन्व्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**********

लक्षवेधी क्रमांक-११५४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. रमेश कोरगांवकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ११५४ पुढीलप्रमाणे आहे : -

"मुंबईतील भांडुप विधानसभेतील कांजुरमार्ग व नाहूर येथे एमएमआरडीएच्या इमारतीचे संकुल असणे, या संकुलातील इमारतीमधील रहिवाश्यांना अनेक प्रकारच्या समस्या गेल्या काही दिवसांपासून उद्भवत असणे, सदर सुंकुलात स्ट्रीट लाईट नसणे, तसेच पाणी, संरक्षण भिंत, ड्रेनेज लाईनच्या समस्यांमुळे इमारतीतील रहिवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागणे, विशेषत: ड्रेनेज लाईनमधून पाण्याचा विसर्ग होण्यास अडथळे निर्माण होत असल्यामुळे पावसाळयामध्ये येथे पाणी इमारतीच्या आवारात साठत असणे, तसेच साचलेले पाणी बाहेर जाण्यास मार्ग नसल्यामुळे ते पाणी इमारतीच्या आवारातच साठून राहणे, यासर्व बाबी रहिवाश्यांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून देखील सदर समस्यांचे निवारण करण्याकडे त्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी उक्त संकुलातील रहिवाश्यांच्यात वाढते असंतोषाचे वातावरण, शासनाने याप्रकरणी तात्काळ चौकशी करुन एमएमआरडीएच्या इमारतीत राहणाऱ्या रहिवाश्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा प्रतिक्रीया.""

---

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

नाहूर येथील प्राधिकरणाच्या संकुलातील बाह्यनिर्गमन आराखडयानुसार वसाहतीतील मल:निसारण दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसचे संकुलातील अंतर्गत रस्ते दुरुस्ती यापूर्वी वर्षे जून, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आलेली आहेत. तथापि, मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत दिनांक २१.०२.२०२३ स्थळपाहणी केली असता संकुलातील पर्जन्यपाण्याचा जलवाहिन्यामधील निचरा होण्यासाठी आऊटलेटची जागा मुंबई महानगरपालिकेतर्फे निश्चित केल्यानंतर संकुलातील अंतर्गत पर्जन्यवाहिन्यांची कामे प्राधिकरणातर्फे करण्याचे प्रयोजन आहे. तसेच प्राधिकरणाच्या बाह्यनिर्गमन आराखडयानुसार विद्युत संबंधित कामे जसे रस्त्याची दिवाबती, उदवाहन दुरुस्ती व संरक्षण भिंतीचे काम प्रस्तावित असून त्यास मंजूरी मिळाल्यानंतर निविदाप्रक्रिया राबवून हाती घेण्यात येतील.

कांजूर मार्ग पूर्व येथील वसाहतीतील १३ इमारतीपैकी ९ इमारतीचे मल:निसारण वाहिनी मोठया व्यासाची टाकणे, पर्जन्यवाहिनीचे काम, सरंक्षण भिंतीचे काम सन २०१६ साली प्राधिकरणाच्या बाह्यनिर्गमन धोरणानुसार पूर्ण केलेले आहेत. उर्वरित चार (०४) इमारतीची (पी.१ ते पी.४ ) मल:निसारण वाहिनी विषयी दिनांक ०३.०८.२०२३ रोजी स्थानिक माजी नगरसेवक व वसाहतीतील रहिवाश्यांसोबत स्थळपाहणी केली असून ते करण्याचे नियोजन चालू आहे तसेच

इमारत क्र पी-३ व पी-४ च्या मल:निसारण प्रक्रिया केंद्राची दुरुस्ती करण्याचा प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे प्रयोजन आहे. सदर वसाहतीतील विद्युत संबंधीत कामे जसे रस्त्याच्या दिवाबत्तीची कामे, उदवाहन दुरुस्तीची कामे प्राधिकरणाच्या बाह्य निर्गमन धोरणानुसार प्रस्तावित असून त्यांस प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन हाती घेण्याचे प्रयोजन आहे.

सदरची कामे प्राधिकरणाच्या बाह्यनिर्गमन धोरणानुसार फक्त एकवेळ करुन देण्याचे धोरण आहे व भविष्यातील वसाहतीतील सर्व दुरुस्ती कामे व दैनदिन देखभाल कामे करण्याची जबाबदारी ही वसाहतीच्या असोसिएशन /गृहसंस्थांची आहे.

कांजुरमार्ग व नाहुर येथील एम.एम.आर.डी.ए च्या वसाहतीमध्ये एकूण ४५ इमारती असून बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सर्व वसाहतींना जलजोडणी यापूर्वी मंजूर करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदर सर्व इमारतींना पुरेसा पाणीपुरवठा होत आहे.

*************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १६१५**

**श्री. योगेश सागर,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई शहर व उपनगरात मुंबई महापालिकेच्यावतीने मालमत्ता कर व इतर कर भरणाऱ्या नागरिकांना रस्त्यांची सुविधा पुरविणे आवश्यक असणे, मुंबई शहर व उपनगरात बऱ्याच ठिकाणी खाजगी रस्ते असणे, मुंबई महापालिकेने दोन्ही बाजूस डी.पी. रोडला जोडणारे रस्ते ताब्यात न घेणे, रस्ते खराब असल्यामुळे लोकांची गैरसोय होत असणे, मुंबईत असे अनेक खाजगी प्लॉट व खाजगी गृहनिर्माण सोसायट्या असणे, यांना ये-जा करण्यासाठी रस्ते असून सुद्धा ते खराब अवस्थेत असून रस्त्यावर खड्डे पडले असणे, महापालिकेच्यावतीने विकासकाला ओ.सी. मिळाल्यानंतर तो घरे विकून निघून जात असणे, महापालिका १५ टक्के पथकर घेत असणे, पण रस्त्याची कामे, दिवाबत्ती पर्जन्यजलवाहिन्याची कामे करीत नसणे, महापालिका कर घेवून सुद्धा मुलभूत सुविधाची कामे करीत नसल्यामुळे दिवाबत्ती नाही, रस्ते खड्डे पडलेले त्यामुळे या परिसरातील नागरिक विशेषत: वरिष्ठ नागरीक, गरोदर महिला शाळेत जाणारी मुळे हे जीव मुठीत धरून प्रवास करीत असणे, यामुळे मुंबईकरामध्ये महापालिकेविरोधात पसरलेला तीव्र असंतोष, मुंबई महानगरपालिका अधिनियम क्रमांक १८८८ के ६३ अन्वये असे रस्ते मुंबई महापालिकेला ताब्यात घेता येत असणे, असे रस्ते ताब्यात घेऊन महापालिका तेथील पर्जन्यजलवाहिन्या, दिवाबत्तीची सोय करण्याची आवश्यकता असणे, खाजगी लेआऊट मध्ये जर बंदिस्त संरक्षण भिंत टाकलेली असेल, प्रवेशद्वार बनविलेले असेल याला वगळून बाकीचे सर्व रस्ते विकासकाकडून करून घेण्याबाबत मुंबई महापालिकेला निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

खाजगी प्लॉट/खाजगी गृहनिर्माण संस्थांच्या संकुलातील अंतर्गत रस्ते हे त्यांच्या मालकीचे असल्याने संबंधित विकासक / गृहनिर्माण संस्थाने सदर रस्त्यांचे परिरक्षण करणे आवश्यक आहे. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेल्या रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती करणे, दिवाबत्ती लावणे इ. कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केली जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात दर्शविण्यात आलेल्या रस्त्यांच्या जागेचे महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागामार्फत अधिग्रहण झाल्यानंतर महानगरपालिकेच्या रस्ते व वाहतूक विभागामार्फत रस्ते बांधणीचे काम हाती घेण्यात येते.

डी. पी. रोडला जोडणारे रस्ते खाजगी असल्यास विकासकाकडून संलग्न भूखंडाचा विकास करताना ते बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित करता येतात. तथापि डी. पी. रोडला जोडणारे रस्ते अस्तित्वात असल्यास अशा रस्त्यांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३०६ अन्वये महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक रस्ता म्हणून घोषित केले जाते व तद्नंतर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २९७ अंतर्गत सदर रस्त्यास नियमित रस्ता रेषा

प्रस्तावित करून मंजुर केली जाते. त्यानंतर, नियमित रस्ता रेषेत येणारे भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ताब्यात घेतले जातात व सदर मालकास मोबदला म्हणून चटई क्षेत्र निर्देशांक / विकास हक्क प्रमाणपत्र / आर्थिक मोबदला देण्यात येतो.

खाजगी अभिन्यासातील रस्ते बनविण्याची जबाबदारी विकासकाची असते. त्याबाबत नियोजन प्राधिकरणाने संबंधित अभिन्यास मंजूर करताना नमूद केलेल्या अटी व शर्ती पाळणे विकासकास बंधनकारक असते. तसेच अशा अभिन्यासातील रस्ते त्या अभिन्यासात वास्तव्य करणाऱ्या रहिवाश्यांच्या वापराकरिता असतात. विकासकाने अभिन्यासातील इमारतींसोबत अभिन्यासातील रस्ते हे गृहनिर्माण संस्था / फेडेरेशनच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.

सतत १२ वर्षे व त्यापेक्षा अधिक कालावधीपासून नागरिकांकडून येण्या-जाण्यासाठी वापर होत असलेला व ९ मीटर किंवा त्यापेक्षा जास्त रुंदीचा रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्यांना जोडलेला असेल अशा रस्त्यांबाबत हस्तांतरण करुन घेण्यासाठी स्थानिक नागरिकांची मागणी तसेच लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम क्रमांक १८८८ च्या कलम ६३(के) अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार प्रस्ताव सादर केला जातो व त्यास महापालिकेची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर रस्ता ६३(के) अंतर्गत महापालिका रस्ता म्हणून जाहीर केला जातो. तद्नंतर सदर रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केली जाते.

खाजगी प्लॉट / अभिन्यास / खाजगी गृहनिर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करणे, दिवाबत्ती लावणे, पर्जन्य जलवाहिन्यांची कामे करणे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत येत नाहीत.

**********

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी)अधिवेशन**

**श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

""कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या २७ गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारच्या अमृत पाणीपुरवठा योजने अंतर्गत सुरु असलेले जलकुंभाचे काम ठेकेदाराने निकृष्ट दर्जाच्या केल्यामुळे, डोंबिवली जवळील भोकर गावातील पाण्याच्या टाकीचा भाग कोसळण्याची नुकतीच घडलेली घटना, सदर घटना ताजी असतानाच कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील कटई गावातील मराठी शाळेजवळील जलकुंभाचा काही भाग कोसळणे, भोकर येथे अमृत योजने अंतर्गत पाण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असून त्याकरिता रस्ते खोदण्यात येणे, ठेकेदाराने निकृष्ट काम व हलगर्जीपणा करुन काम करण्यात येणे, या ठिकाणी सुमारे ९ लाख लिटर क्षमतेच्या टाकीचे बांधकाम सुरु असणे, इतके मोठे काम सुरु असताना दोन पाण्याच्या टाक्यांचा भाग कोसळल्याने कामाच्या दर्जाबाबत संशय निर्माण होणे, केंद्र सरकार व राज्य सरकार कोटयावधी रुपये खर्च करुन शासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्यावतीने काम करीत असताना, प्राधिकरणाचे संबधित अधिकारी व महानगरपालिकेचे अधिकारी यांनी बांधकाम करणाऱ्या ठेकेदारांबरोबर आर्थिक संगनमत करुन व निकृष्ट बांधकाम करुन मोठया प्रमाणात शासकीय निधीचा अपव्यय करण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास येणे, शासनाने सदर जलकुंभ टाकीच्या झालेल्या बांधकामाची गुणवत्ता तपासून निकृष्ट काम केल्याप्रकरणी उच्च स्तरावरुन चौकशी करुन संबधित काम करणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी व त्याकामावर देखरेख करणारे महानगरपालिकेचे पाणी पुरवठा अधिकारी, अभियंता यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, तसेच सदर कंत्राटदाराकडून तात्काळ सदर काम काढून घेऊन त्या कंत्राटदारास काळया यादीत टाकण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र संतापाचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.""

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट २७ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याच्या प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पातील काम सुरु असताना दिनांक १५ मे, २०२३ रोजी भोपर येथील जलकुंभाचे व दिनांक १६ मे, २०२३ रोजी काटई येथील जलकुंभाचे कॉंक्रेटीकरणाचे काम सुरु केल्यानंतर बॉटम स्लॅब भरण्याच्या वेळी दोन्ही ठिकाणी जलकुंभाच्या गॅलरीतील सेंट्रिंगचा काही भाग त्याला लावलेले सपोर्ट हलल्यामुळे निखळला व त्यावेळेस टाकीच्या बॉटम स्लॅब भरण्याचे काम सुरु असल्याने लगतच्या भागावर टाकलेले ओले कॉंक्रेट खाली पडले, सदर दोन्ही भोपर व काटई येथील जलकुंभाचा पूर्ण झालेल्या बांधकामाचा भाग कोसळलेला नाही. सदर घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कंत्राटदारास सदर प्रकल्पाची कामे पार पाडताना आवश्यक तांत्रिक बाबी व गुणवत्तेबाबत सर्व प्रकारच्या खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यास अनुसरून कंत्राटदारामार्फत उपरोक्त दोन्ही ठिकाणाचे सेंट्रिंग आरसीसी सल्लागारांमार्फत तपासून घेतले असून त्याठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने परवानगी दिल्यानंतर भोपर व काटई येथील जलकुंभाच्या टाकीच्या बॉटम स्लॅबचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

रोटा. एच/१९३७ (७५०-७१-२३) (क्र.मा.प.

सदर प्रकल्पाच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्यांचे व कॉंक्रेट क्यूबच्या तपासण्या वेळोवेळी घेण्यात येऊन या चाचण्यांचे अहवाल समाधानकारक आहेत व विहित प्रमाणात आहेत. सदर प्रकल्पांतर्गत पाईपलाईन टाकण्यासाठी रस्ते खोदणे आवश्यक आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेले रस्ते पूर्ववत करण्यात येतात सदर रस्ता दुरुस्तीच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचे चाचण्यांचे अहवाल समाधानकारक आहेत. तसेच, सदर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण व्ही.जे.टी.आय., मुंबई या शासकीय अभियांत्रिकी संस्थेमार्फत करण्यात येत असून प्राप्त अहवालानुसार प्रकल्पाचे काम समाधानकारक आहेत.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १८४३

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, श्री.निलेश लंके, श्री. ज्ञानराज चौगूले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८४३ पुढील प्रमाणे आहे.

" नाशिक जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातील सेवक-सेविकांच्या बदल्यांमध्ये तत्कालिन कनिष्ठ प्रशासन अधिकारी अनिल गिते यांनी आर्थिक देवाणघेवाण घेऊन नियमबाहयरित्या बदल्या केल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू प्रकरणी जिल्हा परिषद नर्सेस संघटनेच्या जिल्हा अध्यक्षा शोभा खैरनार यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांचेकडे तसेच आरोग्य विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद पिंगळे यांना लेखी तक्रार निवेदन देऊन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी करण्यात येणे, सदरहू आरोग्य विभागातील बदली प्रक्रियेमध्ये गेली पाच वर्षापासून बाहेरील जिल्हयातून आलेल्या कर्मचाऱ्यांना पेसा तालुक्यात बदल्या न देता नाशिक शहरालगत बदल्या देण्यात येणे, तर दुसरीकडे पेसा तालुक्यातील कर्मचाऱ्यांना बदल्यांमध्ये हे गांव रिक्तच नसल्याचे दाखवून त्यांची दिशाभूल करण्यात येणे, सदरहू बदल्या शासन आदेश डावलून करण्यात येत असल्याचा प्रकार निदर्शनास येणे, सदरहू जिल्हा स्तरावरुन आरोग्य विभागातील कनिष्ठ प्रशासन अधिकारी अनिल गिते आणि संबधित अधिकाऱ्यांनी आर्थिक संगनमत करुन, खोटे पुरावे जोडून, घटस्फोटीत तसेच खोटे अपंगाचे दाखले जोडून जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात बदल्या करण्यात येणे, तसेच पती हयात असतानाही विधवा असल्याचे खोटे प्रमाणपत्र जोडणे, तसेच दिव्यांग असल्याचे खोटे प्रमाणपत्र जोडून अनेक अधिकारी कर्मचाऱ्यांना सोयीच्या ठिकाणी लाखो रुपयांची लाच घेऊन बदली देण्यात आल्याचा उघडकीस आलेला गंभीर प्रकार, हया सर्व प्रमाणपत्रांची पुन्हा एकदा पडताळणी करण्याची आवश्यकता, सदरहू कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्याकडून आरोग्यसेविका महिलांशी दादागिरीची व अर्वाच्य भाषा वापरली जाणे, बिले मंजुर करताना टक्केवारी मागितली जाणे, घाणेरडी भाषा वापरुन त्यांना अपमानित केले जाणे, सदरहू प्रकरणांसंबधी नर्सेस संघटनेच्या जिल्हा अध्यक्षांनी शासनाकडे तसेच विभागीय आयुक्तांना लेखी तक्रार करुनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यास्तव श्री.गिते यांना तात्काळ निलंबित करुन त्यांची लाचलूचपत खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, यामुळे आरोग्य विभागातील नर्सेसमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

C:\Users\Hp\Desktop\प्र.क्र.४८४-२०२३ लक्षवेधी सूचना १८४३.Docx२
HB-2434 - 700 प्रती

**श्री.गिरीश महाजन, मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन.**

नाशिक जिल्हा परिषदेमधील आरोग्य विभागातील आरोग्य सेवक-सेविकांच्या बदल्या ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि. १५ मे, २०१४ मधील प्रकरण-१ मधील ३(ब) व ४ मधील १ ते १० मधील तरतूदनुसार विनंती अर्ज व मागणी प्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन कर्मचाऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे रिक्त ठिकाणी बदली करण्यात आली आहे. आंतरजिल्हा बदलीने आलेल्या कर्मचाऱ्यांना मागणी केलेल्या व उपलब्ध रिक्त ठिकाणी बदलीने पदस्थापना दिलेली आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संघटनेने घेतलेल्या आक्षेपाप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांचे अपंग प्रमाणपत्र फेर पडताळणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आली आहे.

बदली प्रक्रियेबाबत कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांनी श्री. अनिल गिते, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्या विरुध्द तक्रार केलेली नाही. तथापि, दि.०६.०६.२०२३ रोजी श्री.अनिल गिते यांची जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातून लघू पाटबंधारे विभागात बदली केली आहे. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नर्सेस संघटनेनी दि. ०२.०८.२०२३ रोजी श्री.अनिल गिते, कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्या विरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे निवेदन जिल्हा परिषद, नाशिक कडे दिले आहे.

* * * * * * *

लक्षवेधी सूचना क्र. १२७६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे दुसरे पावसाळी अधिवेशन

श्री. सुनिल केदार, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. अमिन पटेल, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्री. विकास ठाकरे, श्री. संजय जगताप, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली सूचना क्र.१२७६ पुढीलप्रमाणे आहे:-

"वीज कंपन्यांमध्ये यापूर्वी केलेल्या इतर संचालकांच्या बेकायदेशीर नेमणूका शासनाने रद्द केल्या असणे, परंतू ताकसांडे हे स्वतंत्र संचालकाच्या नावाने विज कंपनीतील कामे वाटप करीत असतांना कंत्राटदाराकडुन वसुली करीत असणे, व स्वतःच विज कंपनीत सर्वेसर्वा आहे ह्या अविर्भावात वागणे, अधिकाऱ्यांना धमकावणे, निलंबित करणे, चौकशी लावणे व त्यांनी बेकायदेशीरपणे माहे मे, जून २०२३ मध्ये अनेक वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी यांच्या कंत्राटदारामार्फत केलेल्या बेकायदेशीर बदल्या व काम वाटपात कंत्राटदाराकडून स्वतंत्र संचालकांच्या नावाने वसुल केलेल्या सुमारे १५०० कोटी रूपयाच्या वसुलीची व प्रलंबित असलेल्या भ्रष्टाचार प्रतिबंधक चौकशी सह संजय ताकसांडे हे नजीकच्या काळात सेवानिवृत्त होत असल्याने त्याआधी त्यांना निलंबित करून त्यांची आर्थिक गुन्हे विभागांकडुन चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण मधील संचालक पदांच्या निवडीची कार्यवाही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित च्या प्रचलित नियमानुसार कायदेशीररीत्या व पारदर्शक पद्धतीने करण्यात येते. निवडीची पूर्ण प्रकिया खुल्या जाहिरातीद्वारे अर्ज मागवून विहित अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी करून उच्च स्तरीय समिती मार्फत मुलाखत घेऊन करण्यात येते. समितीमार्फत निवड झाल्यानंतर नियुक्तीची कार्यवाही संबंधित कंपनीकडून करण्यात येते. काही संचालकांनी त्यांचे वैयक्तिक कारणामुळे राजीनामा दिला. त्यामुळे शासनाने या नेमणुका रद्द केल्या असे म्हणणे संयुक्तिक राहणार नाही,

शेरा · एवं -१३८६ (८०० · ११ · २०२३) (कृ · मा · प ·

महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीच्या जाहिरात क्रमांक MSEBHCL ०४ / २०२० नुसार महावितरण कंपनीमध्ये संचालक (संचालन) या पदावर श्री संजय ताकसांडे यांची महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीतर्फे नियमाप्रमाणे नेमणूक करण्यात आली व दिनांक १९.०३.२०२१ रोजी ते संचालक (संचालन), महावितरण म्हणून रुजू झाले. ते या अगोदर एप्रिल २०१९ ते मार्च २०२१ या काळामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये संचालक (संचालन) म्हणून कार्यरत होते. तसेच मार्च २१ ते ऑगस्ट २१ पर्यंत त्यांच्याकडे संचालक (संचालन), महापारेषण या पदाचा अतिरिक्त कार्यभार सुद्धा होता.

वीज कंपनीतील कामवाटप हे ई-निविदा काढून नियमानुसार व पारदर्शक पद्धतीने सक्षम अधिकारी / संचालक मंडळाच्या मान्यतेने करण्यात येते.

महावितरण कंपनीत सद्यास्थितीत अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे व्यतिरिक्त एकूण १० संचालक असून त्यामधे संचालक (संचालन), संचालक (वाणिज्य), संचालक (मानव संसाधन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) तसेच ०१ Government Director, ०२ Independent Directors आणि ०२ Nominee Directors हे महावितरणच्या संचालक मंडळावर आहेत. Government Director, Independent Director आणि Nominee Director हे कुठल्याही प्रकारे महावितरणच्या Day to Day Functioning मध्ये कार्यरत नसतात.

महावितरण कंपनीतील बदली धोरण हे प्रशासकीय परिपत्रक क्रमांक ५१४ दि. १०.०८.२०१५ प्रमाणे प्रत्येक वर्षी आढावा घेऊन ठरविण्यात येते. त्यातील महत्त्वाचे मार्गदर्शक तत्वे जसे प्रशासकीय बदल्या, विनंती बदल्या, वैद्यकीय कारणासाठी बदल्या अशा विविध प्रकारच्या बदल्या त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे महावितरण मधील बदल्या अतिशय पारदर्शक पद्धतीने प्रत्येक वर्षी होत असतात व त्या महावितरण कंपनीच्या प्रचलित परिपत्रकानुसार व नियमाप्रमाणे करण्यात येतात.

**************

**लक्षवेधी सूचना क्र. १७९६**

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुनिल केदार, श्री.हिरामण खोसकर, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.सुभाष धोटे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७९६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"गुन्हे अन्वेषण विभाग औरंगाबाद येथे नुकतीच बदली झालेले आणि नाशिक ग्रामीणचे तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री.सचिन पाटील यांनी नाशिक येथे कार्यरत असताना राष्ट्रीय महामार्ग तीन वरील पिंपळगाव बसवंत टोल नाक्यावर जाण्यासाठी लेन रिकामी ठेवण्यात आली नसल्याने त्यांना राग येऊन त्यांनी टोल नाक्यावरील महिला कर्मचारी यांच्याशी केलेले गैरवर्तन, त्यांना उठवशा काढायला लावून केलेली मारहाण, दारू पिऊन घातलेला धिंगाणा, स्वतःला वाचविण्यासाठी आरटीपीसी चा बागुलबुवा करून महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ३५३ ३३२ अन्वये दाखल केलेले गुन्हे सीसीटीव्ही मधील फुटेज उघड होऊ नये म्हणून dvr ची केलेली चोरी, litigation च्या जमिनी देण्याच्या नावाखाली नाशिक ग्रामीण भागातील स्वतःच्या नावे केलेली ८० एकर जमीन, अमलदाराकडून नियमितपणे हप्ता वसुली करून पूर्ण कालावधीत सुमारे शंभर कोटीची केली कमाई व जमवलेली माया, बंगल्यावर दहा महिलांची नेमणूक करून त्यांच्याकडून दारूचे पेग भरून घेणे, त्यांच्याशी अंगलट करणे, मुलाची शी साफ करून घेणे, अधिकारी कर्मचारी यांच्या बदली करण्यासाठी घेतलेले दोन ते पाच लाख रुपये, स्वतःचे जिल्हा बदलीचे प्रकरण चव्हाट्यावर येऊ नये म्हणून ५७ वर्षाच्या महिला कर्मचाऱ्यावर भारतीय दंड संहिता कलम ४२० व ४६५ अन्वये दाखल केलेले गुन्हे, तसेच इगतपुरी तालुक्यातील आदिवासींच्या शिधावाटप दुकानावर बेकायदेशीरपणे कारवाई करून आदिवासी लोकांना जातीवाचक केलेली शिवीगाळ, या प्रकरणी नाशिक येथील न्यायालयात त्यांच्याविरुद्ध अॅट्रॉसिटी खाली दाखल झालेले गुन्हे, तसेच पोलिस उप आयुक्त, ठाणे येथे पदाचा गैरवापर करून सृष्टी को ऑ. हौ. सो., कोलबाड, ठाणे येथील पदाधिकाऱ्यांवर खोटे व चुकीचे गुन्हे दाखल केल्या प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्या बाबत मुख्यमंत्री, अतिरिक्त सचिव, गृह विभाग, पोलिस महासंचालक यांचेकडे केलेल्या लेखी तक्रारी, उपरोक्त सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी होऊन पुढील कार्यवाहीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पाठविलेला अहवाल तथापि त्यावर अध्यापही न करण्यात आलेली कारवाई, त्यामुळे पोलीस विभागात व जनतेत पसरलेली असंतोषाची भावना, अशा अधिकाऱ्यांमुळे जनतेचा पोलीस विभागावरील उडालेला विश्वास, अशा मनमानी करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता आणि ज्या लोकांवर अन्याय केला आहे त्यांना न्याय मिळवून देण्याची गरज यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना यावर शासनाची प्रतिक्रिया."

**मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

श्री.सचिन पाटील, भापोसे हे पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण या पदावर कार्यरत असताना त्यांच्या विरोधात मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त झाल्याने व अनेक प्रकरणांत त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित झाल्याने त्यांची दिनांक २०.१०.२०२२ रोजीच्या शासन आदेशान्वये पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण येथून पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.

**प्रस्तुत लक्षवेधी सूचनेमध्ये खालील ६ घटनांचा समावेश आहे.**

१) पिंपळगाव बसवंत टोलनाका प्रकरण.

२) नाशिक ग्रामीण भागातील ८० एकर जमीन गैरव्यवहार व इतर आक्षेप.

३) नाशिक ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयातील पोलीस अंमलदार यांच्या बदल्यांमधील भ्रष्टाचार प्रकरण.
४) स्वत:च्या जिल्हा बदली प्रकरणाच्या अनुषंगाने कर्मचा-यांवर दाखल झालेले गुन्हे प्रकरण.
५) इगतपुरी तालुक्यातील आदिवासींच्या शिधावाटप दुकानांवर केलेली बेकायदेशीर कारवाई प्रकरण
६) पोलीस उपायुक्त, ठाणे येथे पदाचा गैरवापर करुन सृष्टी को.ऑ.हौ.सो., कोलबाड ठाणे येथील पदाधिका-यांवर खोटे व चुकीचे गुन्हे दाखल केल्याबाबतचे प्रकरण.

**<u>घटनावार विश्लेषण.</u>**

पिंपळगाव बसवंत टोलनाका प्रकरणी श्री. सचिन पाटील, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्याकडून अशोभनीय वर्तन झाल्याचा व त्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन आपले अधिनस्त असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना चुकीचे आदेश देऊन गुन्हे दाखल करुन गंभीर गैरवर्तन केले आहे, असा निष्कर्ष काढून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याची व त्यांच्यावरील दोषारोप हे गंभीर स्वरुपाचे असल्याने अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ मधील नियम ३ (१) अन्वये त्यांना शासन सेवेतून निलंबित करण्याची शिफारस पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १९/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली होती. त्यानुषंगाने श्री. सचिन पाटील, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांना तात्काळ प्रभावाने शासन सेवेतून निलंबित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. दरम्यान, श्री.सचिन पाटील, भा.पो.से. यांनी मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणात मूळ अर्ज क्र.८०२/२०२२ अन्वये याचिका दाखल केली असून या याचिकेमध्ये मा. केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाने दिनांक ३०/०९/२०२२ रोजी "parties to maintain status quo" असे आदेश देऊन परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दिनांक २२.११.२०२२ रोजीच्या संकीर्ण याचिकाद्वारे (Miscellaneous Application) या प्रकरणात दिलेला "status quo" रद्द करण्यासाठी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणास विनंती करण्यात आली होती. शासनाने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणामध्ये दाखल केलेल्या दिनांक ११.११.२०२२ रोजीचे शपथपत्र व दिनांक २२.११.२०२२ रोजीची संकीर्ण याचिकेविरोधात (Miscellaneous Application) श्री.सचिन पाटील यांनी पुन्हा केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणात शपथपत्रे (Affidavit in Rejoinder to the Reply of the Respondent) दाखल केलेली आहेत. सद्यस्थितीत सदर प्रकरण केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये प्रलंबित आहे.

सदर प्रकरणी तत्कालीन पोलीस अधीक्षक, नाशिक (ग्रामीण) व वाडीव-हे पोलीस ठाणे येथील पोलीस अधिका-यांनी त्यांच्या कार्यकाळात पदाचा गैरवापर करुन यांनी जमवलेली करोडो रुपयांची अवैध संपत्ती तसेच आदिवासी कुळांच्या जमीनी उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असतांना नाशिक मधील भू-माफियांच्या मदतीने सुमारे चाळीस एकर जमीन हडप करुन मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर संपत्ती जमा केल्याने संबंधितांची ला.प्र.वि. मार्फत चौकशी करुन गुन्हे दाखल करण्याची तक्रार शासनास प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने, महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. सदर अभिप्राय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस अंमलदार यांच्या बदल्यांमध्ये भ्रष्टाचार झाल्याबाबत खोट्या नावाने एक निनावी तक्रार अर्ज पोलीस उप महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांच्याकडे प्राप्त झाला होता. त्यावर पोलीस उप महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी प्राथमिक चौकशी केली आहे. प्राथमिक चौकशीत श्री. सचिन पाटील, तत्कालिन पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांची कसूरी दिसून येत असल्याचे नमूद करुन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाने शासनास सादर केला होता. त्यानुषंगाने श्री.सचिन पाटील, तत्कालिन पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्याकडून चौकशी अहवालातील मुद्यांबाबतचा

खुलासा मागविण्यात आला होता. त्यानंतर, या प्रकरणी शासनाच्या वतीने शपथपत्र दाखल करण्याच्या पुर्वीच श्री.सचिन पाटील, भोपोसे, यांनी दाखल केलेल्या मूळ याचिका क्र.१०५०/२०२२ च्या अनुषंगाने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशान्वये दिनांक २९.११.२०२२ रोजीचे पत्र रद्द केले आहे. त्यास अनुसरुन केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या निकालाविरुद्ध मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपील करावे किंवा कसे याबाबत मुख्य सादरकर्ता अधिकारी, केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी दिनांक २७.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिलेले अभिप्राय विचारात घेवून प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकरणी केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ, यांनी दिनांक ०२/०३/२०२३ रोजीच्या निकालाविरुद्ध मा.उच्च न्यायालयात अपील दाखल करणे योग्य नसल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहे. त्यानंतर विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने, सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

जिल्हा बदली प्रकरणासंदर्भात बाहेरील घटकांमधून नाशिक ग्रामीण घटकात आंतरजिल्हा बदलीने बदलीवर येऊ इच्छिणाऱ्या २१ अंमलदारांनी त्यांची स्वतःची अथवा त्यांच्या नातेवाईकांच्या उपचारांची बनावट वैद्यकीय कागदपत्रे बनविल्या प्रकरणी नाशिक तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नों.क्र. १५१/२०२२, कलम ४२०, ४६८, ४७१, ४६७, १२० (ब), ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर घटना पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या हद्दीत घडलेली असल्याने सदर गुन्हा मूळ कागदपत्रांसह पुढील तपासासाठी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने या प्रकरणी सदर गुन्ह्याची आडगाव पोलीस ठाणे, नाशिक शहर, येथे गु.र.नं .46/2023 कलम ४२०, ४६८, ४७१, ४६७, १२० (ब), ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे नोंद करण्यात आलेली असून सद्यस्थितीमध्ये सदर गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा, नाशिक शहर यांच्यामार्फत सुरु आहे.

इगतपुरी तालुक्यातील आदिवासींसाठी असलेल्या शिधावाटप दुकान क्रमांक १११ गडगड सांगवी येथे वितरण करण्यासाठी ठेवलेले ३२ कट्टे तांदुळ व १ कट्टा गहू असे धान्य रेशनदुकानदार हे काळ्या बाजारात विक्रीसाठी नेताना दिसून आल्याने प्राप्त झालेल्या तक्रारीवरून गुन्हा नों.क्र.१२९/२०२२, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा दाखल करताना आरोपीचे पती यांचा संबंधित पोलीस निरीक्षक यांच्याशी झालेल्या वादावरुन व्यथित होवून आरोपीच्या पतीने मा.अपर जिल्हा सत्र न्यायालय-२, नाशिक यांचे न्यायालयात सीआरपीसी क्र.१५६ (३) प्रमाणे तक्रार दाखल केली होती. त्यानुषंगाने मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार वाडी व-हे पोलीस ठाणे येथील तत्कालिन पोलीस निरीक्षक, व इतर ६ यांचेविरुध्द फिर्यादीस जातीवाचक शिवीगाळ करुन, पदाचा गैरवापर करुन सार्वजिक ठिकाणी अपमानित करुन हाकलून दिल्याबाबत गुन्हा नोंदणी क्र.१९६/२०२२, कलम १९३, २०३, २०५, २१९, २२०, ३२३, ५०४, ३४ भारतीय दंड विधान संहिता सह अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ च्या कलम क्र.३ (१) (पी) (क्यु) (आर) (एस) प्रमाणे दिनांक ३०/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील आरोपींनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे एफ.आय.आर. रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेमध्ये न्यायालयाने तपास चालू ठेवून आरोपींविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई न करणेबाबत व दोषारोप न्यायालयाच्या पुर्वपरवानगीने दाखल करणेबाबत आदेशित केले असल्यामुळे या प्रकरणी कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. सदर गुन्हयाचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, मालेगांव ग्रामीण, विभाग यांच्यामार्फत सुरु आहे.

दिनांक ०९/०१/२०१६ रोजी फिर्यादी यांनी त्यांच्या कार पार्किंगच्या जागेवर सिमेंट पिलरला लोखंडी साखळ्या लावून त्यांची मोटार गाडी पार्क करण्यास प्रतिबंध केल्याबाबतच्या तक्रारीवरुन सोसायटीचे सचिव, अध्यक्ष व खजिनदार यांचेविरुध्द राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे पोलीस आयुक्तालय येथे गुन्हा रजि. नं. II ०२/१६, कलम ४४७, ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासामध्ये फिर्यादी व सोसायटी सभासद यांनी तक्रारीत नमूद केलेला वाद हा दिवाणी स्वरुपाचा असल्याने सदर वाद दिवाणी न्यायालयातून सोडविणे अपेक्षित असतांना फिर्यादी यांनी त्यांना पार्किंगचे हक्क खरेदी खतामुळे प्राप्त झाले आहेत या गैरसमजुतीतून हा गुन्हा दाखल केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे दि.३०/०९/२०१६ रोजी मा.मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, मुख्य न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात गुन्हयाची "क" समरी अहवाल सादर करुन गुन्ह्याची निर्गती करण्यात आलेली आहे. सदर गुन्हा दाखल करणेबाबत तत्कालिन पोलीस उप आयुक्त यांनी पदाचा गैरवापर केल्याप्रकरणी कोणतेही तक्रारी अर्ज प्राप्त झाले नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे.

*********

लक्षवेधी सूचना क्र. १८७७

## महाराष्ट्र विधान सभा

## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री. मंगेश रमेश चव्हाण, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८७७ पुढीलप्रमाणे आहे :**

"जळगांव येथील भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टी स्टेट कॉ-ऑप क्रेडीट सोसायटी (बि.एच.आर.) या पतसंस्थेमध्ये नोव्हेंबर २०२० मध्ये पुणे येथे नोंद झालेल्या तिन्ही गुन्हयात फिर्यादी हजर नसतांना विस्मयकारकरित्या गु.र.क्र. ७५४/२०२० गुन्हयाची नोंद रात्रौ २३.५६ वा. पोलिस ठाणे शिक्रापूर, पुणे ग्रामीण पोलिस, गु.र.क्र. ७७३/२०२० गुन्हयाची नोंद सकाळी २.३३ वा. पोलिस ठाणे डेक्कन पुणे शहर पोलिस आयुक्तालय, गु.र.क्र. ३०६/२०२० गुन्हयाची नोंद सकाळी ००.१० वा. पोलिस ठाणे आळंदी पिपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात, सदरील गुन्हे एकाच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर, २०२० रोजी नोंदविण्यात आलेले असणे, विशेष बाब म्हणजे गुन्हा घडल्याचा कालावधी पोलिस रेकॉर्डप्रमाणे वर्ष २०१५ असा असतांना, केवळ काही विशिष्ट व्यक्तींना सदरील गुन्हयात गोवण्याकरीता फौजदारी दंड प्रक्रिया संहितेचे उल्लंघन करून अत्यंत नियोजनबद्धरीत्या तो गुन्हा नोंदणेकामी कुठलाही फिर्यादी पोलिस ठाण्यात हजर नसतांना संबंधित पोलिस अधिका-यांनी स्वतःच फिर्यादीच्या खोटया सहया करून घिसडघाईने गुन्हे नोंदविले असणे, तसेच पुणे शहर पोलिस आयुक्तालयाअंतर्गत डेक्कन पोलिस ठाण्यातील गु.र.क्र. ६७३/२०२० हा गुन्हयासाठीच्या कार्यालयीन टिप्पणीत खाडाखोड करून पाने देखिल बदलविण्यात आलेली असणे, विशेष आश्चर्याची बाब म्हणजे सदरील गुन्हे हे जरी २५ व २६.११.२०२० रोजी नोंदविण्यात आलेले असतांना, सदरील गुन्हयाकामी तपासाकरीता जाणा-या अधिकारी व कर्मचा-यांकरीता पूर्वीच म्हणजे २३.११.२०२१ रोजी फर्दापूर येथील अजंता गेस्ट हाउस बुक करण्यात आलेले असणे, फिर्यादी गैरहजर असताना रात्री उशिरा ते पहाटे, उपरोक्त गुन्हे हे २०१५ या वर्षी झालेल्या तथाकथित घटनेबाबत अत्यंत पूर्वनियोजन करून योजनाबद्धरित्या नोंदविण्यात आलेले असणे, तसेच सदरील पोलिस कारवाईमागे तत्कालीन उच्चपदस्थ पोलिस अधिकारी, जसे की- तत्कालीन पोलिस उपायुक्त आर्थिक गुन्हे शाखा पुणे यांनी आपले अधिकारांचा स्वैर व गैरवापर करून गुन्हे नोंदविलेले असणे, तसेच कुठलीही प्राथमिक चौकशी न करता एकाच पध्दतीने तिन्ही गुन्हे दाखल करण्यात आलेले असणे, एवढेच नव्हे तर सदरील पोलिस तपासादरम्यान झालेल्या खर्चाची खोटी बिले जमा करून शासनाकडून संबंधित अधिका-यांनी रक्कम वसूल केलेली असणे, फिर्यादीत व एफआयआर मध्ये १० आरोपींची नावे असतांना १५ आरोपींविरूद्ध नॉनबेलेबल वॉरंट काढण्यात आलेले असणे, सदरील गुन्हयात श्री. सुरज झवर यांचे एफआयआर मध्ये नाव नसतांनादेखील त्यास ऐनवेळी आरोपी करून बेकायदेशीरपणे अटक केलेली असणे, त्या कारणास्तव मा. मुंबई उच्च न्यायालयाने जा.अ.क्र. १७१२/२०२१ यात तपास अधिका-यांवर ताशेरे देखील ओढलेले असणे, तसेच सदरील गुन्हयातील अटक आरोपी जितेंद्र कंडारे तत्कालीन अवसायक बि.एच.आर. सोसायटी, पूर्वीच दाखल झालेल्या व तपासावर असलेल्या गुन्हयात त्यांना न्यायालीन कोठडीत असतांना ते तपासाकरीता उपलब्ध असताना न्यायालयीन कोठडीत असताना व संधी असतांना त्यांना तपासासाठी कधीही ताब्यात घेतलेले नसणे, परंतु, त्यांना पुणे सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर जाणीवपूर्वक ते मागासवर्गीय असल्याने केवळ त्या आकसापोटी तत्कालीन पोलिस उपायुक्त आर्थिक गुन्हे, पुणे श्रीमती

भागश्री नवटके यांनी त्यांना तपासासाठी प्रलंबित असलेल्या गुन्हयात अटक करणे, संबंधित पोलिस उपायुक्तांचे मागासवर्गीयांबद्दल असलेले प्रेम सर्वसृत असणे, तसेच कंडारे हे मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटी ॲक्ट २००२ च्या तरतुदीनुसार अवसायक पदाचा कारभार पाहत असल्याने, ते सर्व प्रकारच्या प्रशासकीय कारणांकरीता मा. केंद्रीय निबंधक बहुराज्यीय सहकारी संस्था नवी दिल्ली यांचे अधिपत्त्याखाली येत असणे, त्यामुळे कंडारे यांचे विरूद्ध त्यांचे कार्यालयीन कामकाजादरम्यान घडलेल्या तथाकथीत गुन्हयाबाबतीत त्यांचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यापूर्वी, फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अन्वये केंद्रिय निबंधकांची परवानगी घेणे क्रमप्राप्त होते, तसेच उपरोक्त कायदयाच्या (मल्टी स्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट) चे कलम ११७ अन्वये परवानगी घेणे देखील बंधनकारक असूनही, तशी कोणतीही परवानगी न घेणे, तसेच या गुन्हयात गोवण्यात आलेले श्री. महावीर जैन तत्कालीन ऑडिटर बि.एच.आर. सोसायटी यांचे वर ५६ कोटी रु.चा अपहार केल्याबाबत आरोप ठेवण्यात आलेला असणे, परंतु, दोषारोप पत्रात त्यांचावर केवळ ७.५ लाख रू. इतकी व्यावसायिक फी घेउन अपहार केल्याचा आरोप ठेवलेला असणे, एमपीआयडी कायदयानुसार गुन्हा दाखल करण्यापूर्वी २०१८ च्या स्टॅंडींग ऑर्डर प्रमाणे उच्चपदस्थ पोलिस अधिकाऱ्यांची (पोलिस महासंचालक किंवा अतिरिक्त पोलिस महासंचालक) परवानगी घेणे आवश्यक असतानादेखील त्याचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या एमपीआयडीचे कलम कुठलीही चौकशी न करता लावण्यात आलेले असणे, या उपरोक्त गंभीर प्रकरणात तक्रार दिल्यानंतर राज्य गुन्हे अन्वेषण विभाग म.रा.पुणे यांना उपरोक्त गुन्हयासंदर्भात पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या गैरप्रकाराबाबतीत चौकशी करण्याचे आदेश दिलेले असतांना, त्यासंबंधात चौकशी करून अहवाल सादर करण्यात आलेला आहे किंवा कसे? याबाबत संभ्रम निर्माण होणे, व तसा अहवाल प्राप्त झाला असल्यास त्याबाबतीत दोषी अधिकाऱ्यावर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे किंवा कसे? या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भुमिका. "

---

## मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टिस्टेट को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि.जळगाव या पतसंस्थेच्या १७ संचालकांनी ठेविदारांच्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी सदर संचालकांविरुद्ध सन २०१४ ते सन २०१५ या कालावधीमध्ये संपुर्ण महाराष्ट्रात वेगवेगळया पोलीस स्टेशन्समध्ये दाखल गुन्ह्यांच्या तपासामध्ये रु.७८३,३१,२९,५१०/- इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रकरणी विशेष सत्र न्यायालय, जळगाव येथे खटल्याची सुनावणी सुरु आहे.

आर्थिक गैरव्यवहार झाल्याकारणाने सदर पतसंस्था बंद पडली. सदर गुन्ह्यातील पतसंस्था, संचालकांच्या मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करून जमा होणा-या पैशातून ठेवीदारांना त्यांच्या ठेवींच्या प्रमाणात समान वाटप करण्यासाठी सन २०१५ मध्ये निबंधक, केंद्रीय सहकार विभाग यांनी श्री. जितेंद्र कंडारे यांची अवसायक म्हणून नेमणूक केली होती.

श्री. कंडारे व इतर आरोपी यांनी संगनमत करून ठेवीदारांना खोट्या कागदपत्रांच्या आधारे २० ते ३० टक्के रक्कम स्वीकारायला भाग पाडून, त्यासाठी ठेवीदारांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यासाठी ठेवीदारांवर दबाव/प्रोत्साहन देऊन गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या मालमत्ता नाममात्र किंमतीला लिलावाद्वारे विकणे, मिळकत विकत घेणा-या लोकांशी व ठेवींबाबत तडजोड करणा-या लोकांना सहाय्य करून संस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तांची विक्री करणे व त्याद्वारे प्रक्रियेमध्ये अपहार झाला असणे अशा प्रकारच्या तक्रारी पोलीस विभागाकडे प्राप्त होत होत्या. त्यानुसार दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० रोजी बी.एच.आर.पतसंस्थेचे अवसायक जितेंद्र कंडारे व इतर यांचेविरुद्ध १) डेक्कन पोलीस ठाणे,पुणे शहर येथे गुन्हा रजि.क्रं. ६७३/२०२० (पहाटे ०२.३३ वाजता), २) शिक्रापूर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गुन्हा रजि.क्रं.७५४/२०२० (२३.५६ वाजता), ३) आळंदी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड गुन्हा रजि.क्रं.३०६/२०२० (००.१० वाजता) हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

भाईचंद हिराचंद रायसोनी मल्टिस्टेट को- ऑप. क्रेडीट सोसायटी लि.जळगाव या पतसंस्थेचे लेखापरिक्षक यांनी दिलेल्या चुकीच्या माहितीच्या आधारे उपरोक्त नमूद तीन खोट्या गुन्ह्यांमध्ये गोवल्याने प्रकरणाची चौकशी होण्याबाबत अर्जदार श्री. सुनिल झवर व श्री. कुणाल शहा यांनी शासनाकडे विनंती केली होती. त्याअनुषंगाने, राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी होऊन शासनास अहवाल सादर करण्यात आला असून त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, (१) आळंदी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड रजि. क्रं. ३०६/२०२० (२) डेक्कन पोलीस ठाणे, पुणे शहर गुन्हा रजि. क्रं. ६७३/२०२० (३) शिक्रापूर पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण गुन्हा रजि. क्रं. ७५४/२०२० असे एकाच दिवशी एका पाठोपाठ एक गुन्हे दाखल होण्याची वेळ पाहता सर्व गुन्हे दाखल करताना पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण या पोलीस घटकामध्ये समन्वय साधून कारवाई केली असल्याचे दिसून येत आहे. तसेच, प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करताना फ़ौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ अन्वये सक्षम प्राधीकरणाची परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच, पुणे शहर पोलिस आयुक्तालयाअंतर्गत डेक्कन पोलिस ठाण्यातील गु.र.क्र. ६७३/२०२० हा गुन्हयासाठीच्या कार्यालयीन टिप्पणीत खाडाखोड करून पाने देखिल बदलविण्यात आलेली असून, श्री. कंडारे यांचे विरूद्ध त्यांचे कार्यालयीन कामकाजादरम्यान घडलेल्या तथाकथीत गुन्हयाबाबतीत त्यांचे विरुद्ध गुन्हा नोंदविण्यापूर्वी, फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अन्वये तसेच, मल्टी स्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ चे कलम ११७ अन्वये केंद्रीय निबंधक(सहकार) यांची परवानगी घेणे बंधनकारक असूनही तशी परवानगी घेण्यात आलेली नाही. याशिवाय, उपरोक्त नमूद तिन्ही गुन्हयाच्या तपासामध्ये एमपीआयडी कायदा कलम ४ व कलम ८ अन्वयेचा प्रस्ताव अद्यापपर्यंत शासनास पाठविण्यात आला नसल्याचे निष्कर्ष सदर अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहेत. सदरच्या अहवालामधील निष्कर्षाच्या आधारे, तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांच्या कार्यवाहीतील त्रुटी संदर्भात पोलीस महासंचालक यांचेमार्फत संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासे मागवून त्यानुसार पुढील कारवाई करण्याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास कळविण्यात आले आहे.

******

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. अशोक चव्हाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली**

**लक्षवेधी सूचना क्र. १८५९ पुढीलप्रमाणे:-**

" नांदेड जिल्ह्यातील उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे कालवे तसेच त्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त झाल्यामुळे तातडीने त्यांची दुरुस्ती न झाल्यास कालवा निरुपयोगी ठरण्याची शक्यता असणे, याच प्रकल्पांतर्गत पाण्याची तूट भरून काढण्याच्या उपाययोजनेंतर्गत उपसा जलसिंचन योजनांना सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, सन १९८६ मध्ये सुरु करण्यात आलेल्या मात्र अद्याप ०% उपयुक्त ठरलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण होणे आवश्यकता असणे, सुमारे ३५ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या विष्णुपुरी प्रकल्पांतर्गत पंप तसेच उद्धरण नलीका नादुरुस्त झाल्या असल्याने त्यांची उपयुक्तता निम्मी होणे. अधिक क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाच्या सुधारीत प्रकल्प अहवालानुसार फेर नियोजनास अद्याप मान्यता न मिळणे, महाराष्ट्रातील बाभळी धरणातून तेलंगणातील पोचमपाड प्रकल्पांकडे जाणारे पाणी धरण भरल्यानंतर समुद्रात वाहून जाणे मात्र, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे बाभळी धरणाचे दरवाजे २९ ऑक्टोबर पूर्वी बंद करण्यास मनाई असणे, यामुळे समुद्रात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी बाभळी धरणाचे दरवाजे बंद करण्याच्या वेळापत्रकात सुधारणा करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयात दोन्ही राज्याच्या सहमतीचा प्रस्ताव अद्याप सादर न होणे, जायकवाडी, उर्ध्व पेन गंगा आणि पूर्णा प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी पश्चिम वाहीनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळते करण्याबाबत राज्य एकात्मिक जल आराखड्यानुसार अद्याप कार्यवाही न होणे, मराठवाड्यातील धरणांमधील तूट भरून काढण्याआधीच वॉटरग्रीड प्रकल्प रेटण्याचा प्रयत्न सुरु असणे, परिणामी दुष्काळग्रस्त मराठवाडयातील पाण्याची समस्या अधीक गंभीर होत असल्याने सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजी यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.. "

## मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे निवेदन

➢ **उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत क्षतिग्रस्त कामे:-**

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत मुख्य कालवा व काही शाखा कालवे क्षतिग्रस्त झालेले असुन त्या कालव्याच्या सर्वेक्षणाची कामे तीन निविदेअंतर्गत पुर्ण झालेली असुन सदर क्षतिग्रस्त कामाचे अंदाजपत्रके तयार करण्याची कामे सुरु आहेत. तसेच मुख्य कालवा व शाखा कालाव्यावरील साधारणत: ३० ते ४० वर्षापुर्वी झालेल्या बांधकामांपैकी काही बांधकामे क्षतिग्रस्त झाली आहेत. परंतु

सदरची बांधकामे मोठी असल्यामुळे क्षतिग्रस्त बांधकामांची संरचनात्मक तपासणी करुन दुरुस्ती करण्याचे नियोजन असुन सदर बांधकामांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

➢ **उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाची तूट भरुन काढणे**

सापळी धरण पुनर्नियोजन व पुनर्विलोकन अंतर्गत प्रस्तावीत १) गोजेगाव उच्च पातळी बंधारा येथून ९७ दलघमी पाणी व २) दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातुन उपसाद्वारे ५८२ दलघमी पाणी इसापुर धरणात वळविण्याचे प्रस्तावित आहे. मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक याचे पत्र दि.२७.०१.२०२३ पाणी उपलब्धता प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे. तद्नंतर महामंडळाकडून दि.१४.०३.२०२३ अन्वये प्रस्ताव प्राप्त असून सदर प्रस्ताव सादरीकरणात आहे.

उपरोक्त दोन्ही कामाच्या सर्वेक्षणासाठी रु. १७.१३ कोटीची तरतूद उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा सहाव्या सुप्रमा प्रस्तावामध्ये करण्यात आलेली असुन, सदर सुप्रमा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे सादर असून छाननी पूर्ण झाली आहे. प्रकल्पाच्या सहाव्या सुप्रमा अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त दोन्ही योजनांची सर्वेक्षणांची कामे हाती घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करण्यात येईल.

➢ **लेंडी आंतरराज्य मोठा प्रकल्प ता.मुखेड जि.नांदेड**

लेंडी मोठा प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगणा या राज्यांचा संयुक्त प्रकल्प आहे. प्रकल्पांतर्गत लेंडी नदीवर, नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यातील गोणेगांव जवळ मातीचे धरण बांधण्यात येत आहे. प्रकल्पाच्या कामास सन १९८६ मध्ये सुरूवात करण्यात आली आहे.

प्रकल्पाचे चतुर्थ सुधारीत अद्यावत किंमत रु. २१८३.८८ कोटी असून त्यात महाराष्ट्र राज्याच्या कामाची किंमत संयुक्त कामासह रुपये २०३३.१२ कोटी व तेलंगाना राज्य कालव्याची कामाची किंमत रूपये १५०.७६ कोटी आहे. सदर प्रकल्पाच्या माती धरणाचे काम ७० टक्के पूर्ण झाले असून घळभरणीचे काम शिल्लक आहे. १४ वक्रद्वार पैकी १० द्वारांचे उभारणी काम पूर्ण झाले असून उर्वरित व्दार उभारणीचे कामे शिल्लक आहे. कालव्याची कामे प्रगतीत आहेत. लेंडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणारे एकूण १९ गावांच्या शेतजमीनीचा मावेजा वाटप करण्यात आला आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रात एकूण १२ गावे येत असुन १२ गावठाणांचा मावेजा वाटप करण्यात आला आहे. पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधांची कामे प्रगतीत आहेत.

परंतु प्रकल्पग्रस्तांनी "आधी पुनर्वसन मग धरण" या प्रमुख मागणी करीता प्रकल्पाचे काम दि. ६.४.२०११ पासून बंद पाडले आहे. प्रकल्पग्रस्तांची वाढीव कुटुंबांचे पुनर्वसन याकरिता सुद्धा मागणी आहे.

लेंडी प्रकल्पातंर्गत १२ गावातील ज्या वाढीव कुटूंबाना पुनर्वसन अनुदान द्यावयाचे आहे, त्यांची आकडेवारी व प्रतिकुटूंब रूपये ३.६९ लक्ष याप्रमाणे एकूण रू. १३०.२५७ कोटीचा आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.२३.०३.२०२३ अन्वये प्राप्त असून सदर प्रस्ताव मंजूरीसाठी सादरीकरणात आहे.

प्रकल्पाची उर्वरीत कामे मार्गी लावण्यासाठी व नियोजनानुसार प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यासाठी विषयांकीत रू.१३०.२५७ कोटीचा प्रस्तावास शासन स्तरावरून मान्यता होऊन शासन निर्णय निर्गमित झाल्यास मौ.मुक्रमाबाद व इतर ११ गावातील बाधित प्रकल्पग्रस्तांच्या वाढीव कुटूंबाना पुनर्वसन अनुदान वाटप करून प्रकल्पाचे उर्वरीत कामे मार्गी लागतील. तसेच ३५ वर्षापासून रखडलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम समयबध्द नियोजनानूसार जून-२०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

➢ **शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प ता.जि.नांदेड**

जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक २०.११.२०१४ मधील निर्देशानुसार उपसा सिंचन योजनेकरीता परिगणकाचे संकल्पन उपसा सिंचन योजना मंडळ नाशिक यांचे मार्फत करण्यात येवून उपसमिती व नंतर स्थायी समितीत अंतिम करण्यात येतात त्याअनुषंगाने परीगणके निश्चित करण्यासाठी दिनांक २४.०२.२०२३ रोजी उपसमितीची बैठक संपन्न झाली असून सदर परीगणके स्थायी समितीत अंतिम करण्यासाठी दि.१५/०३/२०२३ रोजी स्थायी समितीची बैठक संपन्न झाली आहे. सदर परिगणके स्थायी समितीत अंतिम झाली असून पंप व उध्दरण नलिका नव्याने बसविण्याचे प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकास राज्य तांत्रिक सल्लागार समितीची सहमती दिनांक ०६/०७/२०२३ रोजी झालेल्या १९६ व्या बैठकीत प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयामार्फत शासनास सादर आहे. सदरील प्रस्तावास शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेनुसार निविदा कार्यवाही पूर्ण करुन काम हाती घेण्यात येईल व त्याची उपयुक्तता पूर्ववत होईल.

➢ **सहस्रकुंड प्रकल्प**

सहस्त्रकुंड जलविद्युत बहुउद्देशीय प्रकल्पाच्या सुधारीत आराखडयास शासनाने पत्र क्र. संकीर्ण २०१८/१०३०/(प्र.क्र.३०८/२०१८)/म.प्र. दि. ३०/११/२०१८ अन्वये तत्वत: मंजूरी मिळाली आहे. त्यानुसार सदर प्रकल्पाचे विविध घटक जसे मुख्य धरण, संपुट धरण, वक्र द्वारे इत्यादीचे संकल्पनाचे

काम पूर्ण करण्यात आले असून त्यास सक्षम स्तरावरून मान्यता मिळाली आहे. वाढीव सिंचनक्षेत्राच्या पाणीवापराचा प्रस्ताव मुख्य अभियंता (जलसंपदा), जलसंपदा विभाग औरंगाबाद यांचे पत्र क्र. तांशा-८/धा-६०/२३८७, दि.१७/०७/२०२३ अन्वये मुख्य अभियंता जल विज्ञान, नाशिक यांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प हा मुख्यतः सिंचन प्रकल्प झाल्याने प्रकल्पास ४७०१ या लेखाशीर्षांतर्गत मान्यता देऊन प्रकल्पाचे नाव सहस्त्रकुंड प्रकल्प करण्यास दि. १९/०६/२०२३ रोजीच्या नियामक मंडळाच्या बैठकीत मंजुरी मिळाली आहे. सद्यस्थितीत प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरु आहे.

➢ **बाभळी मध्यम प्रकल्प (बळेगावसह) ता.धर्माबाद जि.नांदेड**

नांदेड जिल्ह्यातील बाभळी उच्च पातळी बंधाऱ्याच्या संदर्भात पाणीसाठ्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.२८/०२/२०१३ च्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार मागील १० वर्षापासून दरवर्षीचे संचालन पर्यवेक्षकीय समितीच्या देखरेखीखाली मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करत बाभळी बंधाऱ्याची द्वारे दरवर्षी ०१ जुलै ते २८ ऑक्टोबर या पावसाळा कालावधीत उघड्या स्थितीत (पाणीसाठा करण्यात येत नाही) व २९ ऑक्टोबर ते ३० जून पर्यंत बंद स्थितीत ठेवण्यात येतात. तसेच प्रतिवर्षी ०१ मार्च रोजी ०.६० अ.घ.फु. (१७.०० दलघमी) पाणी पोचमपाड प्रकल्पात सोडण्यात येते. या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार दि.२९ ऑक्टोबर पूर्वी बाभळी बंधाऱ्याची सेवाद्वारे खाली टाकण्याऐवजी पोचमपाड प्रकल्प ज्या दिवशी पूर्ण संचय पातळीला भरुन पाणी समुद्रात सोडण्यात येते त्या दिवशी बाभळी प्रकल्पाचे सेवाद्वारे बंद करुन पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण करणे किंवा बाभळी बंधाऱ्याचा पाणी साठा ०.६० अ.घ.फु. ने कमी करुन दरवर्षी पावसाळ्यात सेवाद्वारे बंद करुन ३८.४९ दलघमी (६९%) शाश्वत पाणीसाठा करणे याबाबत सहमती प्राप्त करण्याच्या अनुषंगाने बैठक आयोजित करणे बाबत तेलंगना राज्याचे शासन व प्रशासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तथापी अद्यापपर्यंत तेलंगना शासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. तेलंगना शासनाने वरील प्रस्तावास सहमती प्राप्त करण्यासाठी पाठपूरावा करण्यात येत आहे.

➢ **जायकवाडी, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प आणि पूर्णा प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खो-यात वळविणे.**

उत्तर कोकणातील नार-पार, अंबिका औरगा, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नदी उपखोऱ्यात ३१७ अघफू अतिरिक्त पाणी शिल्लक आहे. त्यापैकी ११५ अघफु पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेबाबतची तरतूद एकात्मिक राज्य जलआराखडयात करण्यात आली आहे.

शासन निर्णय दि. १९.०९.२०१९ अन्वये आंतरराज्यीय दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प व राज्यांतर्गत नार-पार-गिरणा, पार- गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा- एकदरे- गोदावरी हे नदीजोड प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून न घेता राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राज्याच्या निधीतून हाती घेण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. उपरोक्त नदीजोड प्रकल्पामुळे गोदावरी खोऱ्यातील दुष्काळग्रस्त (नाशिक, अहमदनगर, मराठवाडा) भागासाठी १५.५५ अघफू पाणी कोकणातून उपलब्ध होईल.

तसेच २३.९० अघफू पाणी प्रवाही वळण योजनांद्वारे गोदावरी खो-यात वळविणे प्रस्तावित आहे. यापैकी १४ वळण योजना पूर्ण झाल्या असून त्याद्वारे १.०७ अघफू पाणी वळविले जात आहे व ५ बांधकामाधीन वळण योजनांद्वारे १.३५ अघफू पाणी वळविले जाईल. उर्वरित भविष्यकालीन योजनांद्वारे २१.४८ इतके पाणी गोदावरी खो-यात वळविणे प्रस्तावित आहे.

याव्यतिरिक्त नवीन प्रस्तावित वळण योजनांद्वारे ५४.७ अघफू पाणी गोदावरी खो-यात वळविण्याबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**प्रमुख वळण योजनांची सद्यस्थिती :**

दमणगंगा- वैतरणा-गोदावरी (७.१३ अघफू) व दमणगंगा-एकदरे- गोदावरी (५.०० अघफू) नदीजोड प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्यात येत असून सप्टेंबर २०२३ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे.

पार- गोदावरी (३.४३ अघफू) नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीने तांत्रिक तपासणीसाठी सादर केला असून त्यानुसार क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

उपरोक्त नमूद प्रकल्पांस राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची मान्यता व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर मान्यता प्राप्त झालेनंतर राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा. राज्यपाल यांचे निदेशानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य आहे.

***************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १७७७

श्री. सुनिल प्रभू, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"भारताचे मॅचेस्टर म्हणून ओळख असलेल्या भिवंडी या यंत्रमाग उद्योग नगरीत दि.३०/४/२०२३ रोजी गोदामातील इमारत कोसळून ८ नागरिकांचा मृत्यू होऊन १० जण जखमी झाल्याची घटना घडल्याने यंत्रमाग उद्योग नगरीतील अनधिकृत आणि तकलादू गोदामांचा प्रश्न ऐरणीवर येऊनही त्याची शासनाने अद्यापही दखल घेतली नसल्याची गंभीर बाब नुकतीच निदर्शनास येणे, कंपन्यांना देशभर वितरीत करण्यासाठी आपला माल मुंबई नजिक साठविण्याची गरज भासू लागल्याने अनधिकृत बांधकामांच्या गोदामांचे पेव फुटणे, सुरवातीला ग्रामपंचायतीची नाममात्र परवानगी घेऊन लोकप्रतिनिधींनी विकासकांबरोबर आर्थिक संगनमत करुन अनधिकृत गोदामांची बांधकामे करण्यात येणे, बांधकामांसाठी मोकळी जागाच शिल्लक न राहिल्याने विकासकांनी आडवी-ऊभी आणि मजल्यावर मजले चढवून अनधिकृत गोदामांची बांधकामे करण्यात येणे, त्यानंतर २००९ मध्ये येथील ६२ गावांचा एमएमआरडीए क्षेत्रात समावेश करण्यात येणे, एमएमआरडीए क्षेत्रात भिवंडी शहर व तालुक्याच्या ग्रामीण भागातील राहनाळ, पूर्णा, काल्हेर, वळ, कशेळी, दापोडा, गुंदवली आदी ठिकाणी मोठया प्रमाणात निकृष्ट दर्जाची अनधिकृत गोदामांची बांधकामे करण्यात येऊन बजबजपुरी निर्माण होणे, विकासकांनी एमएमआरडीए आणि ग्रामपंचायत व महसुल विभागाच्या सबंधित अधिकारी यांचेबरोबर आर्थिक संगनमत करुन सुमारे १५ हजार गोदामे व ७ हजार घरांची अनधिकृत बांधकामे झाल्याचे मा.न्यायालयात सादर झालेल्या माहितीवरुन उघडकीस येणे, सदर अनधिकृत बांधकामात महसूल विभागाच्या आशिर्वादाने कोटयावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येणे, येथील अनेक गोदामांमध्ये ज्वलनशील रसायनांचा साठा बेकायदेशीररित्या करण्यात येणे, यामुळे गोदामांना आग लागण्याच्या वारंवार दुर्घटना घडून यामध्ये प्राणहानी होऊन कोटयावधी रुपयांचे नुकसान होणे, उक्त अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी यांना देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कारवाई न करता प्रकरण दडपून टाकण्यात येणे, सदरहू भिवंडीतील विभाग क्षेत्र एमएमआरडीए क्षेत्राची प्लानींग ॲथॉरिटी असल्याने त्यांनी या भागातील गोदाम इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत भिवंडी उपविभागीय अधिकारी यांनी कळवणे हा केवळ फार्स असल्याचा संशय निर्माण होणे, यामुळे बांधकामे कोसळून व आगीच्या घटना घडून हजारो नागरिकांना जीव गमवावा लागून कोटयावधींच्या मालमत्तेचे झालेले प्रचंड नुकसान, या सर्व प्रकाराला जबाबदार असलेले एमएमआरडीए चे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी यांची तात्काळ चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले भितीचे, असुरक्षिततेचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन

१. ग्रामपंचायत वळ तालुका भिवंडी, जि. ठाणे येथील वर्धमान कंपाऊंड वळपाडा येथील मिळकत क्रमांक ११९२ (गोदाम) दि.२९/०४/२०२३ रोजी आकस्मात कोसळली असुन सदर दुर्घटनेत ८ जण मृत्यु पावले असुन १२ जण जखमी झालेले आहेत.

२. सदर दुर्घटना ग्रस्त इमारत श्री. इंद्रपाल गुरुनाथ पाटील व श्रीम. सुचिता इंद्रपाल पाटील यांच्या मालकीची असुन इमारतीचे बांधकाम G+३ मजल्याचे असुन सन २०१३-१४ मधील होती. ग्रामपंचायत वळ तालुका भिवंडीच्या नमुना नं.८ कर आकारणी यादीमध्ये सदर इमारतीचा मिळकत क्रमांक ११९२ असुन अनधिकृत बांधकाम म्हणुन सदर मिळकतीची नोंद आहे. प्राप्त माहितीनुसार मिळकत धारक श्री. पाटील हे या मिळकतीमधील खाद्यपदार्थ यांचे साठवणुक करणेकरीता खाजगी कंपन्यांना उपलब्ध करुन देत होते. तसेच सदर इमारतीवर मिळकतधारक यांनी मोबाईल टॉवरची देखील उभारणी केली होती. दुर्घटनाग्रस्त इमारतीचे कोसळण्याचे प्राथमिक कारण अतिरिक्त साठा ठेवणे व इमारतीची क्षमता नसतांना देखील इमारतीवर मोबाईल टॉवरची उभारणी करण्यात आली होती.

३. ग्रामपंचायत स्तरावरील उपलब्ध अभिलेखाचे पाहणी करता सदर मिळकतीस मिळकत धारक यांनी ग्रामपंचायत किंवा इतर कोणत्याही नियोजन प्राधिकारी यांची बांधकाम परवानगी घेतली नसल्याचे दिसुन आले. तसेच सदर गोदामात साठा करणे संदर्भात ग्रामपंचायत किंवा शासनाच्या कोणत्याही विभागाचे परवानगी घेतल्याचे आढळून आले नाही. मिळकत धारक हे सदर मिळकतीच्या तळमजला व पहिला मजल्याचा वापर साठवणुकीसाठी व दुसरा व तिसरा मजल्याचा वापर रहिवासासाठी करीत असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले.

४. तसेच अशा घटना भविष्यात घडु नये म्हणुन पंचायत समिती भिवंडी या कार्यालयामार्फत दि . ०४/०५/२०२३ रोजी पत्रान्वये भिवंडी गटातील सर्व ग्रामपंचायतींनी त्यांचे हद्दीतील असलेल्या जुन्या इमारती तसेच त्यामध्ये असलेले गोदाम आणि

कंपन्या यांचे स्ट्रक्चरल ऑडीट व अनधिकृत इमारती सर्वे करुन याबाबत आवश्यक ती उपाययोजना करुन त्याबाबतचा अहवाल सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणेच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.

५. नगर विकास विभागाकडील शासन अधिसूचना दिनांक १७ मार्च २००७ अन्वये प्राथमिक स्तरावर भिवंडी परिसरातील ५१ गावे अधिसूचित क्षेत्र व तदनंतर ९ गावे अशी एकत्रित ६० गावे अधिसूचित क्षेत्र म्हणून घोषीत केलेली आहेत. सदर अधिसुचनेनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांना विशेष नियोजन प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहे. त्यामध्ये लक्षवेधी नमूद राहनाळ, पूर्णा, काल्हेर, वळ कशेळी, दापोडा, गुंदवली, व इतर गावाचा देखील समावेश आहे.सदर अधिसूचनेनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदी लागु आहेत.उपरोक्त परिसरात व भिवंडी तालुक्यात असणाऱ्या बांधकाम परवानगी न घेतलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली होती व त्या अनुषंगाने भिवंडी तालुका व परिसरातील मुंबई महानगर विकास प्राधिकरण,भिवंडी-परिसर अधिकृत अधिसूचित क्षेत्र,अंबरनाथ-कुळगाव बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्र,कल्याण ग्रोथ सेंटर व प्रादेशिक योजनेमध्ये अंतर्भूत उर्वरित ग्रामीण क्षेत्र या परिसरात असणाऱ्या अनधिकृत बांधकामे एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली(UDCPR)त्यातील तरतुदी व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये मार्गदर्शक तत्वे यांचा एकत्रित विचार करून अनधिकृत बांधकामे प्रशमन शुल्क (Compounding Charges) आकारून मुदतबद्ध कालावधीत निकाली काढणेसाठी शासनाचे नगरविकास विभागाकडीलपत्र दिनांक.७/४/२०२२ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

६. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ ते ५८ अंतर्गत अनधिकृत विकास बाबत करावयाची कारवाई नमुद केलेली आहे.सदर अधिनियमाच्या अनुषंगाने उक्त नमुद अधिसूचित क्षेत्रातील गावांमध्ये अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडुन केली जाते तसेच MMRDA कडुन उक्त अधिसूचित क्षेत्रातील गावामध्ये बांधकाम परवानगी दिली जाते. सदर क्षेत्रामध्ये ग्रामपंचायती कडुन कोणत्याही प्रकारच्या बांधकाम परवानग्या दिल्या जात नाहीत.

७. दरम्यानच्या काळात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक १३९/२०१३ मधील मा,उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रातील करण्यात आलेल्या सर्वेक्षणात एकुण ६५८२ बांधकामांचे सर्वेक्षण करण्यात आले.त्यापैकी सर्वेक्षणाअंती एकुण १३३४ गोदामांची बांधकामे असल्याचे निदर्शनास आली असून,सदर बांधकाम प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास सुरुवात केली असून,सदर क्षेत्रातील एकूण ४४३ गोदामांच्या बांधकाम प्रकरणी उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार नोटीस कार्यवाही करण्यात आली असून,त्यापैकी २१३ प्रकरणी बांधकाम निष्काशित करणेकामी पोलीस बंदोबस्ताची मागणी करण्यात आली त्यापैकी पोलीस बंदोबस्त प्राप्त झालेल्या ९२ प्रकरणात गोदामांची बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत,तसेच ९३ प्रकरणात मा.न्यायालयात दावे दाखल असून त्यात मा.न्यायालयाने तात्पुरते स्थगिती आदेश पारित केले आहेत.उर्वरित प्रकरणी पोलीस बंदोबस्ताचीमागणी करण्यात येऊन निष्कासनाची कार्यवाही करण्यात येत आहे.सदर निष्कासित केलेल्या प्रकरणात ५७ रासायनिक गोदामांची बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

८. भिवंडी अधिसूचित क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्र (BSNA),अंबरनाथ,कुळगाव-बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्रव (AKBSNA) कल्याण ग्रोथ सेंटर (KGC)या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबतचे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली(UDCPR) च्या व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ कलम १४३ अन्वये दंडात्मक शुल्क आकारून या धर्तीवर धीरान प्राधिकरणामार्फत दिनांक११/०३/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आले. त्याप्रमाणे अनधिकृत बांधकाम नियमित करण्याचे २६१ प्रस्ताव प्राप्त झाले असून,त्यापैकी १८ प्रस्तावांना प्राधिकरणामार्फत मंजूरी देण्यात आली आहे.तसेच अशा घटना भविष्यात घडू नये म्हणून पंचायत समिती, भिवंडी या कार्यालयामार्फत दि. ४/५/२०२३ रोजी पत्रान्वये भिवंडी गटातील सर्व ग्रामपंचायतींनी त्याचे हद्दीतील असलेल्या जुन्या इमारती तसेच त्यामध्ये असलेले गोदाम आणि कंपन्या यांचे स्ट्रक्चरल ऑडिट व अनधिकृत इमारतीचा सर्वे करून याबाबत आवश्यक ती उपाययोजना करून त्याबाबतचा अहवाल सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणेच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

H-1471-13F.

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी)अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१५०९**

श्री. दिलीप दत्तात्रय मोहिते-पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"लाडघर (भंडारवाडा) (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ग्रामीण मार्ग क्रमांक २४७ वरील व या परिसरात पक्क्या स्वरुपात झालेली अनिधिकृत बांधकामे निष्कासित करण्याकरिता माहे मे, २०१९ व माहे सप्टेंबर, २०१९ वा त्यासुमारास संबंधितांना उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग दापोली यांचेमार्फत बांधकाम निष्कासित करण्याबाबत आदेश वितरीत करण्यात आलेले असणे, सदर विषयाच्या अनुषंगाने तत्कालीन ग्रामविकास मंत्री यांनी सभागृहाला दिलेल्या उत्तरात देखील सदरचे अतिक्रमण ८ दिवसांत स्वखर्चाने काढून टाकण्याबाबत जिल्हा परिषदेने कळविले असून याबाबत कायदेशिर बाबी तपासून पोलिस संरक्षणामध्ये सदर अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेमार्फत पोलिस प्रशासन व महसुल विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला असणे, असे असूनही अनधिकृत बांधकामाबाबत लाडघर ग्रामपंचायत, ता.दापोली, गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली व संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये तिव्र नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, मूळ शासन दरबारी नोंद असलेल्या चंडीका मंदिरा जवळील मार्ग क्रमांक २४७ मध्ये बदल शासनास अवगत न करता सदर मार्गात बदल केलेला असणे, बदल केलेला मार्ग खाजगी व्यक्तीच्या जागेतून नेलेला असणे, त्यामुळे मूळ शासन दरबारी नोंद असलेला मार्ग कायमस्वरुपी बंद होण्याची भिती ग्रामस्थांमध्ये असणे, याबाबत अनधिकृतरित्या मार्गात केलेल्या बदलाची माहिती संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना अवगत करुनही त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, अनधिकृत बांधकामाबाबत लाडघर ग्रामपंचायत, ता.दापोली, गटविकास अधिकारी, पंचायत समिती दापोली व संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, सदर प्रकरणी अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणतीही कार्यवाही न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

---

## मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

लाडघर (भंडारवाडी) ता.दापोली जि.रत्नागिरी येथे ग्रामीण मार्ग क्र २४७ आणि या परिसरातील अनधिकृत बांधकामे दोन वेगवेगळ्या स्वरुपाची आहेत.

१. दापोली तालुक्यातील लाडघर कार्यक्षेत्रातील ग्रामीण मार्ग क्र. २४७ हा सन २००१-२०२१ रस्ते विकास योजना आराखडा नुसार जिल्हा परिषद मालकीचा असून सदर रस्त्याची ( ०/०० ते १/०० ) एकूण लांबी १.०० कि.मी. दर्शविण्यात आली आहे.सदर रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे. ग्रामीण मार्ग क्र.२४७ या रस्त्याला लागून पुढे ०/५०० कि.मी.१/०० ते १/५००) लांबीचा डांबरी रस्ता, ग्रामपंचायत मालकीचा आहे.या रस्त्याचा उपयोग लाडघर गावातील भंडारवाडी येथिल जनतेला दळणवळणासाठी होतो. तसेच चंडिका मंदिर येथे नियमित येणारे भाविक तसेच वार्षिक उत्सवासाठी येणाऱ्या भाविकांना रस्त्याचा उपयोग होत आहे. ग्रामीण मार्ग क्र.२४७ वर अतिक्रमण करून रस्ता बंद केल्याचे निदर्शनास आल्यावर उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उप विभाग दापोली यांनी सदरचे अतिक्रमण तात्काळ काढून रस्ता मोकळा करणे बाबत पत्र दि.४/०५/२०१९, दि.२८/५/२०१९, दि.९/९/२०१९ व दि.१७/२/२०२० अन्वये सूचना देऊनही श्री.मोकळ यांनी अतिक्रमण काढलेले नव्हते.

२. ग्रामीण मार्ग क्र.२४७ -रस्त्याच्या साखळी क्रमांक.१/४०० ते १/४३० या दोन ठिकाणी रस्त्यामध्ये श्री.योगेश चंद्रकांत मोकळ यांनी जांभ्या दगडाचे पक्के कंपाऊड बांधून रस्ता बंद केला आहे.तसेच सुमारे ३० मीटर लांबीचा रस्ता आपल्या हद्दीमध्ये घेतला असून रस्त्यावर अतिक्रमण केले आहे.कि.मी.१/४०० मध्ये कंपाऊडच्या बाजूने,स्थानिक ग्रामस्थांना येण्या-जाण्या साठी गैरसोय होऊ नये त्यासाठी तात्पुरता कच्चा रस्ता तयार करून तो डांबरी रस्त्याला पुढे १/४३० मध्ये जोडला असून,सद्यस्थितीत कच्च्या रस्त्याचा उपयोग ग्रामस्थ दळण वळणा साठी करीत आहेत.अशा प्रकारे झालेल्या अतिक्रमणामुळे रस्त्यामध्ये बदल झाला आहे.महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दि.४/११/१९८७ अन्वये जिल्हा परिषदा व ग्रामपंचायत रस्त्यावरील अतिक्रमण आढळून आल्यास ते काढून टाकण्याचे अधिकार मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८चे कलम ५३(२) अन्वये ग्राम पंचायतींना प्रदान केलेले आहे.त्यानुषंगाने श्री.योगेश चंद्रकांत मोकळ यांनी ग्रामपंचायत मालकीची जमीन सं.नं.१५६/१ या मिळकती मध्ये केलेले अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण ग्रामपंचायत लाडघर ता.दापोली यांनी दि.२७/०७/२०२३ रोजी काढून टाकले आहे. लाडघर ग्रामपंचायत अंतर्गत उर्वरित सं.नं.१५६/१ चे अनधिकृत बांधकाम व ग्रामीण मार्ग क्र .२४७ रस्त्याला जोडलेल्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची प्रत्यक्ष कार्यवाही सुरु झाल्यानंतर श्री.योगेश चंद्रकांत मोकळ यांनी दापोली येथील सिव्हील जज्ज यांचे कोर्टात रे.मु.नं,९१/२०२३ दि.२७/०७/२०२३ रोजी प्रतिवादी विरुद्ध दावा दाखल केला व मा.न्यायालयाने" आहे तशी परिस्थिती कायम ठेवण्याचे स्थगिती आदेश "दिल्याने पुढील अनधिकृत बांधकाम काढण्यात आलेले नसून सदरचे प्रकरण "न्याय प्रविष्ठ " आहे.

---